# धान्यापासून दारू : 'निर्माण'चे प्रतिकात्मक उपोषण

गडचिरोली, ४ जानेवारी / वार्ताहर

धान्यापासून दारू बनवण्याच्या निर्णयामुळे महाराष्ट्रात धान्याचा तुटवडा निर्माण होईल, समाजात दारू वाढेल, युवक पिढी व्यसनी होईल व समाजात अराजकता निर्माण होईल. समाजाला अंधाराच्या खाईत ढकलणाऱ्या शासनाच्या या धोरणाचा विरोध म्हणून एक जानेवारीपासून 'निर्माण'च्या युवकांनी प्रतिकात्मक उपोषण सुरू केले आहे.

धरणे किंवा मोर्चे काढून विरोध करण्यापेक्षा जिथे आहोत तिथे राहून व काम करत हे उपोषण सुरू आहे. मानवी साखळी तयार करणारे हे उपोषण आहे. निर्माण युवकापासून सुरू झालेल्या या उपोषणात अनेकजण सहभागी होत आहेत. एक जानेवारीला अमृत बंग, पवन पाटील, महेश देशमुख व नित्या क्रिष्णन यांच्यापासून सुरू झालेल्या या उपोषणासाठी आजपर्यंत ६५ लोकांनी नावे



घरातील कामासोबत गावकऱ्यांचे उपोषणही सुरू आहे.

यादीत नमूद केली आहेत. रोज नवीन सहकारी या उपोषणात सहभागी होऊन ही साखळी पुढे चालवत आहेत. ४ जानेवारीला सर्च संस्थेतील विमल सहारे व अंजना नेवारे यांनी तसेच निर्माणचे सागर अत्रे व गोपाल महाजन यांनी उपोषण केले आहे.

गडचिरोलीपासून सुरू झालेल्या या साखळीत चंदीगडचे प्रीत, अमेरिकेचे ऐमी मॅथ्यू, कर्नाटकचे प्रमल लाड, पाँडेचेरीचे सुतीर्थ रॉय यांचीही नावे उपोषणासाठी नमूद केली आहेत. १९२० साली स्वातंत्र्य संग्रामाच्या वेळी महात्मा गांधींनी सांगितलेल्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या संकल्पनेवर आधारित हे उपोषण असून प्रत्येकाने या उपोषणात सहभागी व्हावे, शासनाच्या धोरणामुळे ज्या लोकांवर उपासमारीची वेळ येईल त्यांच्या दुःखाच्या सह-अनुभूतीसाठी तसेच शासनाच्या धोरणाला कडाडून विरोध करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन निर्माणच्यावतीने करण्यात आले आहे.

\http://foodtoalcohol.wordpress.com या संकेतस्थळाला भेट देऊन कुणालाही या उपोषणात भाग घेता येईल.

लोकसत्ता ५ जाने.